# CCE RR

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M    ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ**

**Code No. : 85-M    Subject : SOCIAL SCIENCE**

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

**सामान्य सूचना :**

i) या प्रश्नोत्तर पत्रिकेत वस्तुनिष्ठ व विवरणात्मक असे एकूण 47 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच पूर्ण उत्तर, संकेताक्षरासह लिहावे.

iii) विवरणात्मक प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. त्याच ठिकाणी आपली उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) वस्तुनिष्ठ आणि विवरणात्मक प्रश्नांसमोर दिलेल्या सूचने प्रमाणे उत्तरे लिहावे.

v) विद्यार्थांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सिलने लिहू नयेत, लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा, आकृत्या, आलेख व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा व जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणा खुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे. त्याचा उपयोग प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

viii) उजव्या बाजूल दिलेल्या मोकळ्या जागेत काही लिहू नका.

I. प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेले आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून प्रश्नाखाली उत्तरासाठी दिलेल्या जागेमध्ये इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर लिहा : $10 \times 1 = 10$

1. **A - यादीत** व्यक्ती आणि **B - यादीत** त्यांच्या घटना दिल्या आहेत. खालील दिलेल्यातले योग्य उत्तर निवडा :

| **A - यादी** | **B - यादी** |
|---|---|
| (a) फाजल अली | (i) प्रांताचे एकत्रीकरण |
| (b) शेख अब्दुल्ला | (ii) पहिले राष्ट्रपती |
| (c) डॉ० राजेंद्र प्रसाद | (iii) राज्य पुनर्रचना आयोग |
| (d) सरदार वल्लभभाई पटेल | (iv) नॅशनल कॉन्फरन्स पार्टी. |

| | ***a*** | ***b*** | ***c*** | ***d*** |
|---|---|---|---|---|
| (A) | i | iii | iv | ii |
| (B) | iv | i | iii | ii |
| (C) | ii | i | iv | iii |
| (D) | iii | iv | ii | i |

2. जगाच्या इतिहासात नोंद झालेली चीन मधील एक असामान्य सैनिकी कवायत कोणती ?

(A) लाँग मार्च (B) विकासाची झेप

(C) सांस्कृतीक क्रांती (D) लोकशाहीसाठी बंड.

3. भारत अलिप्तवादाचा पुरस्करता आहे, म्हणजे

(A) अमेरिकन सत्तागटात समाविष्ट (B) दोन्ही सत्तागटाला समांतर सांभळतो

(C) रशियन सत्तागटात समाविष्ट (D) विस्तारवादी धोरणांचा पुरस्करता.

4. जगाची लोकसभा असे युनोच्या ( UNO ) कोणत्या शाखेला संबोदले जाते ?

(A) सचिवालय (B) सुरक्षा समिती

(C) महासभा (D) विश्वस्थ समिती.

5. भारतीय घटनेत 24 वे कलम महत्वाचे आहे कारण

(A) अस्पृश्यता नष्ट करणे

(B) 14 वर्षापर्यंतच्या मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण

(C) हुंडा पद्धतीला आळा घालणे

(D) 14 वर्षे कमी वयाच्या मुलांना कामावर ठेवल्यास फौजदारी गुन्हा दाखल होतो.

6. एप्रिल-मे महिन्यात भाजी पाला आणि डाळींची लागवड करण्याचे उत्तम उदाहरण


(A) खरीफ पिके

(B) रब्बी पिके

(C) जुनी शेती पद्धत

(D) उदरनिर्वाहाची शेती.

7. नकाशामध्ये दर्शाविलेल्या ठिकाणांची सुसंगत जोडीची दिलेल्या पर्यायातून निवड करा :



(A) a — कोलकाता, b — सुरत, c — विशाखापट्टणम

(B) a — सुरत, b — कोलकाता, c — विशाखापट्टणम

(C) a — विशाखापट्टणम, b — सुरत, c — कोलकाता

(D) a — कोलकाता, b — विशाखापट्टणम, c — सुरत.

8. भारताच्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्याला सहमती देण्याचा अधिकार

(A) राष्ट्रीय योजना आयोग

(B) केंद्रीय अर्थ विभाग

(C) राष्ट्रीय विकास समिती

(D) रिजर्व बँक ऑफ इंडिया.

9. एक व्यक्तीला दैनंदिन पैशाची बचत करून कार खरेदी करावयाची आहे. तर त्याने बँकेत हे खाते उघडले पाहिजे.

(A) बचत खाते

(B) चालू खाते

(C) रिकरिंग ठेव खाते

(D) मुदत ठेव खाते.

10. खालीलपैकी कोणती पहिली भारतीय कंपनी म्हणून NASDAQ मध्ये नोंद झाली ?

(A) रिलायन्स कंपनी

(B) इन्फोसिस टेक्नॉलॉजीस लि०

(C) विप्रो टेक्नॉलॉजीस

(D) बायोकॉन लि०.

II. खालील प्रश्नांची उत्तरे **एका** वाक्यात लिहा : 14 × 1 = 14

11. भारतीय इतिहासकार मौखिक आधार साधनांची निवड का करतात ?

12. खालसा सैनिकानी कोणत्या कारणामुळे ब्रिटीशाविरूद्ध बंड केले ?

13. भारतावरती कोणत्या युरोपियन देशांने अधिक काळ राज्य केले ?

14. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या विकासासाठी कर्नाटक सरकारने कोणते कार्यक्रम आमलात आणले आहेत ?

15. 'संयुक्त राष्ट्र संघ' हे नांव पहिल्यांदा कोणी सुचविले ?

16. सामाजिक स्तर म्हणजे काय ?

17. बाल मजूर कोण आहेत ?

18. कोणत्या ऋतूमध्ये तामिळनाडूमध्ये पाऊस पडत नाही पण भारताच्या इतर भागात पडतो ?

19. 'डेक्कन ट्राप' प्रदेशात कोणत्या प्रकारची माती मिळते ?

20. सध्याच्या काळात आपल्या जलसाठ्याची क्षमता कमी होत आहे. का ?

21. उपजिविकेसाठी केली जाणारी शेती म्हणजे काय ?

22. भारतातील हरित क्रांतीचे जनक कोणाला म्हणतात ?

23. प्रत्यक्ष कर म्हणजे काय ?

24. उद्योगजकता ही राष्ट्राची संपती आहे कशी ?

III. खालील प्रश्नांची **दोन** ते **चार** वाक्यात उत्तरे लिहा : 15 × 2 = 30

25. वैज्ञानिक विकास किंवा शास्त्रिय शोध समुद्र सफरीस ( भौगोलिक संशोधनास ) कारणीभूत ठरले. स्पष्ट करा.

26. श्रीरंगपट्टणम तहाच्या अटी कोणत्या होत्या ?

27. ॲनी बेझंट यांनी भारतीय समाजासाठी दिलेले योगदान कोणते ?

**किंवा**

सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लीम समाजासाठी दिलेले योगदान कोणते ?

28. स्टॅलिनने रशियामध्ये कोणकोणते बदल घडवून आणले ?

29. सरकारने साक्षरता प्रमाण वाढविण्यासाठी हाती घेतलेल्या कोणत्याही चार उपाययोजना लिहा.

30. ''भारताने मानवी हक्काचा दर्जा उंचावण्यासाठी तीव्र ध्यास घेतलेला आहे.'' या विधानाचे स्पष्टीकरण द्या.

31. स्त्रीयांच्या सशक्तीकरणासाठी स्त्री स्वसहाय्य संघाचे महत्व कोणते ?

32. द्विपकल्पीय पठाराचे आर्थिक महत्व कोणते ?

33. भारतात आढळणा-या कोणत्याही चार नैसर्गिक वनस्पतींची नावे लिहा.

34. ऊर्जा उगमांची टंचाई दूर करण्यासाठी कोणत्या उपाय योजना हाती घेण्यात आल्या आहेत ?

35. भौगोलिक माहिती व्यवस्थेचे (G.I.S.) उपयोग लिहा.

36. महापूर येण्याची कारणे कोणती ?

37. ''जलद लोक संख्या वाढ आपल्या देशाच्या प्रगतीला हानीकारक आहे.'' कसे ?

38. ''दर डोई उत्पन्न हा विकासाचा खरा उपाय होऊ शकत नाही.'' का ?

39. जागतिकीकरणाची कोणतेही चार वैशिष्ट्ये लिहा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **सहा** ते **आठ** वाक्यात लिहा : 6 × 3 = 18

40. "भारताच्या पहिल्या स्वांतत्र्य युद्धामुळे (1857 A.D.) प्रमुख बदल झाले." वर्णन करा.

**किंवा**

वाहतूकीच्या व दळणवळणाच्या विकासामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला चालना मिळाली. वर्णन करा.

41. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मूलभूत घटक कोणते ?

**किंवा**

भारताचे इतर देशाशी चांगले संबध का आहेत ?

42. अस्पृश्यता निर्मूलनासाठी हाती घेण्यात आलेल्या संविधानात्मक आणि कायदेशीर उपाययोजना कोणत्या ?

**किंवा**

असंघटीत कामगारांच्या समस्या कोणत्या आहेत ?

43. भारताच्या पूर्व किनार पट्टीवर आणि पश्चिम किनार पट्टीवर असलेल्या महत्वाच्या बंदरांची वेगवेगळी यादी करा.

**किंवा**

उद्योगधंद्याच्या स्थानिकिकरणावर परिणाम करणारे घटक कोणते ?

44. विकेंद्रीकरणाच्या आधारावर गांधीजीच्या 'ग्राम स्वराज्य' या संकल्पनेचे स्पष्टीकरण द्या.

**किंवा**

केंद्र सरकारच्या करेतर उत्पन्नाचे मूळ आधार कोणते ते लिहा.

45. बँकांचे कार्ये कोणती ?

**किंवा**

विमा उतरवतांना कोणकोणत्या गोष्टींची पूर्तता करावी लागते ?

V. खालील प्रश्नाचे उत्तर **आठ** ते **दहा** वाक्यात लिहा : 4

46. "स्वातंत्र्य भारताच्या विकास कार्यक्रमांचे संस्थापक नेहरू होते." वर्णन करा.

VI. 47. भारताचा नकाशा काढून त्यात खालील मुद्दे दाखवा : 1 + 3 = 4

a) $82\frac{1}{2}^{o}$ पूर्व रेखांश

b) भाक्रा नानगल

c) नर्मदा दरी योजना.

**अंध विद्यार्थांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 47 च्या ऐवजी )**

हिमालय पर्वताचे फायदे कोणते आहेत ? 4